लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या अन्नधान्याची उचल व वाटप याबाबतची अचूक आकडेवारी संकलित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : लेखाप-२०१५/प्र.क्र.४०/नापु-२२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १३ जून, २०१९.

वाचा :- (१) केंद्र शासनाचे दिनांक १०.१२.२०१४ चे पत्र.
(२) अ. ना. पु. व ग्रा. सं. विभाग, शासन निर्णय क्र. अधापु-२०१५/प्र.क्र.१००/नापु-२२, दि.२४ जुलै २०१५.
(३) अ. ना. पु. व ग्रा. सं. विभाग, शासन निर्णय क्र. खरेदी-१११५/प्र.क्र.१७/नापु-२९, दि.१४ जाने. २०१६.

प्रस्तावना:-

सद्यस्थितीत राज्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी करण्यात येत असून संदर्भाधीन दि.१०.१२.२०१४ च्या पत्रान्वये केंद्र शासनाने मंजूर केलेल्या अन्नधान्याच्या प्रमाणात सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य वितरीत करण्यात येते. तसेच संदर्भाधीन दि.२४.०७.२०१४ च्या शासन निर्णया नुसार राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा अशा १४ जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक सर्व शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांप्रमाणे सवलतीच्या दराने अन्नधान्याचे वितरण करण्यात येते. सदर योजनांकरिता आवश्यक अन्नधान्याची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या विहीत गोदामांमधून करण्यात येते. तसेच, राज्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत विकेंद्रीत खरेदी योजनादेखील राबविण्यात येत असून त्याअंतर्गत खरेदी केलेल्या धानापासून प्राप्त झालेल्या तांदळाचे (Custom Milled Rice-CMR) तसेच भरडधान्याचे वाटप लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये करण्यात येत आहे. ज्या जिल्ह्यांना CMR/भरडधान्य वाटपाच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत, अशा जिल्ह्यांमध्ये भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामांमधून तांदळाची/गव्हाची उचल न करता त्यांना विहित केलेल्या जिल्ह्यांमधून CMR/भरडधान्याची उचल करून त्याचे लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये वाटप करण्यात येते.

उपरोक्त योजनांकरिता देण्यात आलेले जिल्हानिहाय मासिक नियतन, जिल्हानिहाय मासिक नियतनाच्या अनुषंगाने भारतीय अन्न महामंडळाच्या विहीत गोदामांमधून करण्यात आलेल्या अन्नधान्याची उचल, CMR/भरडधान्याची उचल (केली असल्यास) आणि रास्तभाव दुकानदारांनी लाभार्थ्यांना केलेल्या अन्नधान्याचे वाटप याबाबतची आकडेवारी दररोज उपसंचालक, पुरवठा आयुक्त कार्यालय यांना सादर करण्याबाबत तसेच उपसंचालक, पुरवठा आयुक्त कार्यालय यांनी सर्व जिल्ह्यांची तसेच परिमंडळांची आकडेवारी संकलित करून दररोज शासनास सादर करण्याबाबत यापूर्वी वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. तद्नंतर सदर काम सुलभ व्हावे याद्दष्टीने सदर तक्ता google Drive वर उपलब्ध करुन देण्यात आला असून उपसंचालक, पुरवठा आयुक्त यांच्या कार्यालयाने सर्व क्षेत्रीय कार्यालयाशी दूरध्वनीव्दारे संपर्क साधून त्या तक्त्यात आकडेवारी भरुन घेण्याची कार्यवाही करण्याबाबत त्या कार्यालयास वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. परंतू सदर काम दररोज वेळच्या वेळी केले जात नाही असे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

आता, भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालाच्या अनुषंगाने लोकलेखा समितीने अन्नधान्याची उचल व वाटप यात तफावत राहू नये, यासाठी उपाययोजना करण्याची शिफारस केली आहे. सदर शिफारशीच्या अनुषंगाने लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या अन्नधान्याची उचल व वाटप याबाबतची अचूक आकडेवारी संकलित करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना पुन:श्च देण्यात येत आहेत:-

<u>शासन परिपत्रक</u> :-

(अ) **नियंत्रक, शिधावाटप, तसचे सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्न वितरण अधिकारी यांनी** राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत आणि १४ दुष्काळग्रस्त जिल्ह्यांतील एलपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना देण्यात येणारे जिल्हानिहाय मासिक नियतन, मासिक जिल्हानिहाय नियतनाच्या अनुषंगाने भारतीय अन्न महामंडळाच्या विहीत गोदामांमधून करण्यात आलेल्या अन्नधान्याची उचल, CMR/भरडधान्याची उचल (केली असल्यास), सदर एकूण उचलीच्या अनुषंगाने रास्तभाव दुकानदारांनी गोदामामधून केलेली उचल आणि रास्तभाव दुकानदारांनी लाभार्थ्यांना केलेल्या अन्नधान्याचे वाटप **याबाबतची आकडेवारी दररोज उपसंचालक, पुरवठा आयुक्त कार्यालय यांच्याकडे सादर करावी.**

(ब) सदर आकडेवारी सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी (उप नियंत्रक, जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्न वितरण अधिकारी) Google Drive वर उपलब्ध केलेल्या विवरणपत्रातदेखील विनाविलंब भरावी. याबाबत उपसंचालक, पुरवठा आयुक्त यांच्या कार्यालयाने सर्व क्षेत्रीय कार्यालयांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून **सदर आकडेवारी भरण्याबाबत पाठपुरावा करण्याची व त्यानुसार**

कार्यवाही झाली असल्याची खातरजमा करण्याची संपूर्ण जबाबदारी उपसंचालक, पुरवठा आयुक्त कार्यालय यांची राहील.

(क) उपसंचालक, पुरवठा आयुक्त कार्यालय यांनी सर्व जिल्ह्यांची तसेच परिमंडळांची आकडेवारी संकलित करून सदर उचल व वाटपाबाबतचा एकत्रित अहवाल प्रधान सचिव (अ.ना.पु.व ग्रा.सं.वि.) यांना **दररोज न चुकता सादर करावा**.

(ड) **सर्व क्षेत्रीय कार्यालयांची आकडेवारी व उपसंचालक, पुरवठा आयुक्त कार्यालय यांच्या आकडेवारी यामध्ये कोणतीही तफावत असणार नाही, याची सर्वस्वी जबाबदारी उपसंचालक, पुरवठा आयुक्त कार्यालय यांची राहील.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१३१५२५३२८५०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Netra Prashant Mankame

Digitally signed by Netra Prashant Mankame
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil and Suppliers Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=19e4a6ac471ded0614da7ea31c20099ea471d8436dcf49faa3c0b2e0638732c3, serialNumber=c3da775eedf3e67170f45df66f5deac516c0b0ab689da4176d3bebb60ccad385, cn=Netra Prashant Mankame
Date: 2019.06.13 15:12:45 +05'30'

(ने. प्र. मानकामे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
२. सर्व सह सचिव/उप सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व उपआयुक्त (पुरवठा)
४. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी
५. उपसंचालक, पुरवठा आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
६. निवडनस्ती.